**नि.दी.दा.कं. :- ०४/२०१७**
**नामेदव - वि - आतिश**
**<u>नि.क :- ४१</u>**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क. ०१ यांची साक्ष</u>**
**<u>सरतपास वादीतर्फे श्री. एम.डी. पालीवाल वकील साहेब</u>**

०१. मी साक्षीपुराव्याकरीत शपथपत्र दाखल केले आहे. ते शपथपत्र माझया सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आलेले आहे. ते मला वाचुन व समजावुन सांगीतले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. शपथपत्र नि. ४१ वर आहे.

०२. मी वादग्रस्त शेताचा सातबाराचा उतारा, नमुना ८-अ चा उतारा व तलाठी नकाशाच्या प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. त्या **<u>नि. ४४ ते ४६</u>** वर आहेत. प्रतिवादीने दिनांक १९.०१.२०१६ रोजी मला वाद शेताबाबत करारनामा करून दिला होता. तो करारनामा आता मला दाखविला. त्यावर माझी, प्रतिवादी आतिश, प्रतिवादी पत्नी व तीन साक्षीदारांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करारनामा **<u>नि. ४७</u>** वर आहे. मी प्रतिवादीला वकीलामार्फत नोटीस पाठविली होती. त्या नोटीसची स्थळप्रत आता मला दाखविली. त्यावर माझी व माझया वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर माझया सांगण्याप्रमाणे लिहीलेला आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **<u>नि. ४८</u>** वर आहे. ती नोटीस पोस्टाने पाठवीली. पोस्टाची पावती **<u>नि. ४९</u>** वर आहे. ती नोटीस प्रतिवादीला मिळाली. त्याने मी पाठविलेल्या नोटीसचे उत्तर माझया वकीलाला पाठविले. नोटीसचे उत्तर **<u>नि. ५०</u>** वर आहे. दिनांक ११.०१.२०१७ रोजी मी पोलिस ठाणे पारशिवनी येथे तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारची स्थळप्रत **<u>नि. ५१</u>** वर आहे. पोलिसांनी प्रतिवादी विरूद्ध अ-दखलपात्र गुन्हा नोंदविला. त्या बाबतची पोच **<u>नि. ५२</u>** वर आहे. मी प्रतिवादीला वाद शेती विकली होती त्या बाबतच्या विक्रीपत्राची प्रमाणीत प्रत मी दाखल केली आहे. ती **<u>नि. ५३</u>** वर आहे. मी दावा प्रलंबित असतांना दुयम

DISTRICT COURT NAGPUR

निंबधक यांच्याकडे अर्ज दिला होता. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या अर्जाची मुळ प्रत **नि. ५४** वर आहे. मी दिनांक ०३.०७.२०१८ रोजी मी पोलिसांत तक्रार अर्ज दाखला केला होता. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या तक्रार अर्जाची स्थळप्रत **नि. ५५** वर आहे. दिनांक ०८.०१.२०१८ रोजी मी तलाठी मौजा सावळी यांना अर्ज दिला होता. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या अर्जाची स्थळप्रत **नि. ५६** वर आहे. दिनांक ०९.०६.२०१७ रोजी मी तहसीलदार पारशिवनी यांना अर्ज दिला होता. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या अर्जाची स्थळप्रत **नि. ५७** वर आहे. दिनांक ०९.०७.२०१८ रोजी मी तलाठी मौजा सावळी यांना अर्ज दिला होता. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो अर्जाची स्थळप्रत **नि. ५८** वर आहे. प्रतिवादीने तहसील कार्यालय पारशिवनी या ठिकाणी जबाब दाखल केला होता. त्या जबाबाची प्रत मला मिळाली. ती प्रत **नि. ५९** वर आहे. दिनांक ०५.१०.२०१७ रोजी तलाठी यांच्यामार्फत तहसीलदार यांच्याकडे अर्ज दिला होता. तो अर्ज आता मला दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो अर्ज **नि. ६०** वर आहे. मी माझे आय.डी.बी. आय बॅंक शाखा दहेगाव जोशी येथील खात्याचे पासबुकाची फोटोप्रत दाखला केली आहे. ती **आर्टीकल पी-१** वर आहे

**उलटतपास प्रतिवादीसाठी श्री. मुलमुले वकील साहेब.**

प्रतिवादी व त्यांच्या वकीलांचा पुकारा केला गैरहजर.

**न्यायाच्या दृष्टीकोनातुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

स्वा/-
(एस.डी. वानखेडे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.

स्वा/-
(एस.डी. वानखेडे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.

दिंनाक :- २७/०७/२०१८

DISTRICT COURT NAGPUR

**<u>नि. ६१ च्या आदेशाप्रमाणे सरतपासास परवानगी देण्यात आली.</u>**
**<u>सरतपास वादीसाठी श्री. पालीवाल वकील साहेब.</u>**

०३. मी आय.डी.बी.आय बॅंक शाखा दहेगाव जोशी येथील माझे खाते क्रं. ५७७१००१००००७३९ चे मुळ पासबुक दाखल केले आहे. ते **<u>नि. ६४</u>** वर आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादीसाठी श्री. मुलमुले वकील साहेब.</u>**
**<u>विनंतीवरून तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-
(एस.डी. वानखेडे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.

समक्ष

स्वा/-
(एस.डी. वानखेडे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.

दिंनाक :- १०/०८/२०१८

**<u>उलटतपास शपथेवर सुरू.</u>**

०४. मला लिहीता येत नाही. मला वाचता येते. माझया नावे ३० ते ३५ डेसीमल म्हणजेच एक आर जमिन आहे. प्रतिवादीची पत्नी कोणत्या दवाखान्यामध्ये दाखल होती या बाबत मला माहीती नाही. हे मला माहीती नाही की, प्रतिवादीची पत्नी सरकारी दवाखाना नागपुर येथे दाखल होती. हे मला माहीती नाही की, प्रतिवादीच्या पत्नीला फक्त ४० रूपये प्रसुतीकरीता खर्च आला होता. मी प्रतिवादीला चार लाख रूपये दिले त्यावेळी त्याची पत्नी कोणत्या दवाखान्यामध्ये दाखल आहे याची विचारणा केली नव्हती.

०५. दिनांक १९.०१.२०१६ रोजी माझया बॅंकेच्या खात्यामध्ये चार लाख रूपये होते. ते चार रूपये मुदत ठेवीमध्ये होते. हे म्हणणे खरे नाही की, माझया बॅंकेच्या खात्यामध्ये चार लाख रूपये नव्हते व मी कोणतीही रक्कम प्रतिवादीला दिली नाही.

DISTRICT COURT NAGPUR

०६. मी धनराज लांजेवार ला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी धनराज लांजेवारला व्याजाने पैसे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, धनराज लांजेवारने मला पैसे परत दिले नाही म्हणुन मी त्याची शेती अनिल जिवण पाटील यांना विकली.

०७. दिनांक १८.०५.२०१५ रोजी मी प्रतिवादीला वादग्रस्त शेत विक्री केले होते त्यापुर्वी मी प्रवितादी सोबत करारनामा केला नव्हता. नि. ५३ विक्रीपत्रामधील पान क्रं. ६ वरील रक्कम देण्याचा तपशील रूपये ३,६२,०००/- अक्षरी तीन लाख बासष्ट हजार वेळोवेळी नगदी घरी भरून पावलो हा मजकुर खोटा आहे. साक्षीदार सांगतो की, त्यास विक्रीपत्राच्या नोंदणीच्या वेळी रक्कम रूपये ३,६२,०००/- तहसील कार्यालय पारशिवनी येथे दिली. हे म्हणणे खरे नाही की, या विक्रीचा व्यवहारापुर्वी माझयामध्ये व प्रतिवादी मध्ये करारनामा झाला होता.

०८. आता साक्षीदारास नि. ६७ कागदपत्राची यादीमधील अनुक्रमांक दोन वरील दस्त दाखविला. साक्षीदार सांगतो की, त्या दस्तावर त्याची सही नाही. हे मला आठवत नाही की, दिनांक १८.०५.२०१५ रोजी मी प्रतिवादीला हमीपत्र लिहुन दिले होते. आता साक्षीदारास हमीपत्र दाखविले. साक्षीदार हमीपत्रावर त्याची सही नसल्याचे सांगतो. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १८. ०५.२०१५ चे विक्रीपत्र हे संध्याकाळी ०५.०० वाजताच्या दरम्यान नोंदणी करण्यात आले. प्रतिवादी हा विक्रीच्या वेळी पांझरी डोंगरगाव, जिल्हा नागपुर या ठिकाणी राहत होता. साक्षीदार सांगतो की, आजही प्रतिवादी त्याच ठिकाणी राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मुळ विक्रीपत्र दुस-या दिवशी मिळणार होते म्हणुन प्रतिवादींनी विक्रीची पावती माझयाकडे दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मुळ विक्रीपत्र मी माझयाकडे ठेवले. हे म्हणणे खरे नाही की, विक्रीपत्राची मुळ प्रत आजही माझयाकडेच आहे.

DISTRICT COURT NAGPUR

०९. विक्रीपत्र नोंदणी केल्यानंतर त्या विक्रीपत्राची झेरॉक्स प्रत प्रतिवादींनी मला दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आजही वादग्रस्त शेती माझयाच नावे आहे. हे म्हणणे खरे नाही की, विक्रीपत्राची मुळ प्रत आजही माझयाकडेच असल्यामुळे प्रतिवादी हा आजपर्यंत त्याचे नाव महसुल अभिलेखामध्ये दर्ज करू शकला नाही. हे मला माहीती नाही की, माझयाकडे मुळ विक्रीपत्र असल्यामुळे प्रतिवादींनी माझया विरूद्ध पोलिस ठाणे पारशिवनी येथे तक्रार दाखल केली होती.

१०. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने तलाठीकडे फेरफाराकरीता अर्ज दाखल केला होता व मी त्यावर आक्षेप नोंदविला होता. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त शेताबाबत मी प्रतिवादी सोबत दिनांक २९.०४.२०१५ रोजी रक्कम रूपये १५,००००/- लाखामध्ये करारनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९.०४.२०१५ रोजी मला माझया घरी साक्षीदाराच्या समक्ष ईसारा म्हणुन रक्कम रूपये ७,५०,०००/- मिळाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या करारनाम्यामध्ये विक्रीची तारीख १५.५.२०१५ अशी ठरविण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या करारनाम्याप्रमाणे वादग्रस्त शेती मोजनी करून देण्याचे मी ठरविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीची भेट दस्तलेखक मनोज कोल्हेशी करून दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.०५.२०१५ रोजी प्रतिवादीने मला पुर्ण रक्कम पंधरा लाख रूपये दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.०५.२०१५ रोजी मी प्रतिवादीला विक्री पत्राचा रूपये पंधरा लाखाचा नमुना दाखविला होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.०५.२०१५ रोजी मी प्रतिवादी कडुन मुद्रांकाकरीता ६७,५००/- आणि नोंदणी फी करीता १५,०००/- रूपये घेतले होते. हे मला आठवत नाही की, दस्ताच्या शेवटच्या पानावर मी दिनांक ०५.०५.२०१५ रोजी प्रतिवादीची सही व त्याच्या आईचा अंगठा घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.०५.२०१५ रोजी माझयाकडे शेतीचा सातबाराचा उतारा नसल्यामुळे

विक्रीपत्र होउ शकले नाही.

११. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.०५.२०१५ रोजी मी विक्रीपत्राचे पहीले दोन पाने बदलुन विक्रीची किंमत फक्त ३,६२,०००/- अशी दाखविली. हे म्हणणे खरे नाही की, या बाबत प्रतिवादीने मला त्याच दिवशी विचारणा केली त्यामुळे मी प्रतिवादीच्या हक्कात हमीपत्र लिहुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, पंधरा लाख रूपयांमध्ये सौदा झालेला असतांनाही बाजार भाव किंमतीनुसार विक्रीपत्र नोंदणीकृत केले आहे असे हमीपत्रामध्ये लिहीलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.०५.२०१५ पर्यंत मला चौदा लाख रूपये मिळाले होते असे हमीपत्रामध्ये उल्लेख केला होता. हे म्हणणे खरे नाही की, उरलेले एक लाख रूपये वादग्रस्त शेताची सरकारी मोजनी झाल्यानंतर देण्याचे ठरले होते व ती मोजनी चार महीन्यात करून देणे होते.

१२. मी वादग्रस्त शेताची मोजनी विक्रीच्या पहीले केली होती. परंतु त्या मोजनीची प्रत माझयाकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अशी कोणतीही मोजनी केली नव्हती म्हणुन तशी प्रत माझयाकडे नाही.

१३. हे म्हणणे खरे नाही की, नि. ४७ वरील मुद्रांकावर मागील बाजुस टिंब देउन त्या ठिकाणी फक्त प्रतिवादी व त्याच्या पत्नीची मी को-या मुद्रांकावर सही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त शेती प्रतिवादी व त्याच्या पत्नीच्या नावे सातबाराच्या उता-यामध्ये लावुन घेण्याकरीता मी प्रतिवादी व त्याच्या पत्नीची को-या मुद्रांकावर सही घेतली होती.

१४. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १९.०१.२०१६ रोजी कोणताही माझया व प्रतिवादीमध्ये करारनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला चार लाख रूपये दिले हे खोटे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की,

DISTRICT COURT NAGPUR

दिनांक २९.०४.२०१५ चा करारनामा व दिनांक १८.०५.२०१५ चे हमीपत्र यावर माझी सही नाही हे मी खोटे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

स्वा/-
(एस.डी. वानखेडे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.
दिंनाक :- १६/१०/२०१८

स्वा/-
(एस.डी. वानखेडे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.

DISTRICT COURT NAGPUR